# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(सामान्य प्रशासन विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी कार्यालय: ०७१२–२५२२९९१ ई–मेल: arga@nagpuruniversity.nic.in


## अधिसूचना

क्रमांक : रातुमनावि/साप्र/१९/स/२८८७ दिनांक : ४ जानेवारी २०२०

सर्व संबंधीतांना सूचित करण्यात येते की, डॉ. प्रमोद गोविंदराव येवले हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्र–कुलगुरूपदी कार्यरत असतांना त्यांना, विद्यापीठाविरूध्दच्या तक्रारीच्या आणि महाविद्यालय तक्रार निवारण कक्षाकडून निर्णय न देण्यात आलेल्या तक्रारींचे निवारण करण्यास्तव मा. कुलगुरूंनी गठीत केलेल्या विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाचे अध्यक्ष म्हणून मा. कुलगुरूंनी नामनिर्देशित केले होते (अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/१९/स/२७९१, दिनांक ४ एप्रिल २०१९). डॉ. प्रमोद येवले यांची औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूपदी दिनांक १५ जुलै २०१९ रोजी नियुक्ती झाल्यामुळे **विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाचे अध्यक्ष** म्हणून मा. कुलगुरूंनी आता **डॉ. विनायक श्री. देशपांडे, प्र–कुलगुरू (Officiating) यांना नामनिर्देशित केले आहे.** तसेच विद्यार्थी विकास विभागाचे विद्यमान संचालक **डॉ. अभय मुदगल** हे एकरूप परिनियम क्रमांक ५/२०१९ मधील कलम ५(४)(एक)(घ) नुसार विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाचे सदस्य–सचिव राहतील.

विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाबाबत दिनांक ४ एप्रिल २०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेत नमूद केलेला अध्यक्षाचा कालावधी जोपर्यंत राहील तोपर्यंत डॉ. विनायक श्री. देशपांडे यांचा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षातील अध्यक्षत्वाचा कालावधी राहील. तसेच विद्यार्थी विकास विभागाच्या संचालकपदी डॉ. अभय मुदगल हे जोपर्यंत कार्यरत राहतील तोपर्यंत ते विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाचे पदसिध्द सदस्य–सचिव राहतील. कोणत्याही कारणास्तव त्यांचे पद रिक्त झाल्यास पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून त्यांचे विद्यापीठ तक्रार निवारण कक्षातील अध्यक्षत्व व सदस्यत्व आपोआप संपुष्टात येईल.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये,

(डॉ. नीरज खटी)
कुलसचिव (प्रभारी)

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाचे मा. अध्यक्ष व सर्व सदस्य.
२. विद्यापीठातील विविध प्राधिकरणांचे सर्व सदस्य.
३. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख.
४. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक.
५. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख.

(प्रदीप बिनीवाले)
उपकुलसचिव (सा.प्र.)
(अति. प्रभार)